# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम 2003 च्या कलम ४२(६) अंतर्गत)

**पुनर्विलोकन (Review) अर्ज क्रमांक ४ / २०२१**

**(अभिवेदन क्र. ६ / २०२१ च्या आदेशाविरूध्द)**

विद्युत जोडणी न देता आकारलेल्या वीज देयकाबाबत

अमर अशोक डोके ........................................................ अपिलार्थी

विरूद्ध

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, सोलापूर ग्रामीण (महावितरण) ....... प्रतिवादी

उपस्थिती

अपिलार्थीतर्फे :- अमर अशोक डोके

प्रतिवादीतर्फे :- अे. पी. हुवाले, कार्यकारी अभियंता, महावितरण सोलापूर ग्रामीण

**कोरम : दिपक लाड**

सुनावणी दिनांक :- १० जून २०२१

आदेश पारीत दिनांक :- २३ जुलै २०२१

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ (ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६) मधील विनियम १९ नुसार विद्युत लोकपाल (मुंबई) याच्या दिनांक ३१ मार्च २०२१ च्या अभिवेदन क्रमांक ०६/२०२१ मधील आदेशाचे पुनर्विलोकन करण्यासाठी अपिलार्थी - अर्जदाराने दिनांक २८ एप्रिल २०२१ रोजी अर्ज सादर केलेला आहे.

२. विद्युत लोकपाल (मुंबई) यानी अभिवेदन क्रमांक ०६/२०२१, दिनांक ३१ मार्च २०२१ च्या आदेशात खालील प्रमाणे निर्देश दिलत.

*"६ …………*

*थ) वरील सर्व बाबींचा विचार करता सदरचे प्रकरण गुणवत्तेवर, व ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६ विनियम ६.६ च्या निकषावर पात्र ठरत नाही. तथापि, ग्राहकांना वीज पुरवठा कायम स्वरूपी प्रतिवादी यांनी बंद केला असल्यामुळे कल्पीत थकबाकी (Ficticious arrears) वगळून ग्राहकास देयक देण्यात यावे तसेच शासन व महावितरण यांच्या सयूंक्त विद्यमाने थकबाकीबाबत सवलत देण्याची जर कोणती योजना अस्तित्वात असेल व अपिलार्थी त्याच्या निकषावर पात्र ठरत असेल, तर, त्याचा लाभ अपिलार्थीस, त्यानी अर्ज केल्यानंतर देण्यात यावा.*

*द) या प्रकरणाच्या अनुषंगाने प्रतिवादी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अश्या प्रकारची अनेक प्रकरणे असण्याची शक्यता नाकारता येत नाही, तेव्हा त्यांनी या संबधात योग्य ती कार्यवाही त्वरीत करावी व अश्या सर्व ग्राहकांना वीज देयके वितरीत केली जातात कि नाही, याची खातर जमा करावी. अश्या सर्व ग्राहकांना मीटरवर वीज पुरवठा कसा त्वरीत सुरू केला जाईल याबाबत वरीष्ठांशी चर्चा करून योग्य त्या उपाय योजना कराव्यात, जेणेकरून त्यांना महसुलास मुकावे लागणार नाही."*

३. अपिलार्थी - अर्जदाराने आपल्या पुनर्विलोकन अर्जात उपस्थित केलेले मुद्दे संक्षिप्तपणे खालील प्रमाणे.

- अपिलार्थीचे, विद्युत लोकपाल (मुंबई) यांच्या अभिवेदन क्र. ६ / २०२१ मधील दिनांक ३१ मार्च २०२१ च्या आदेशाने समाधान झाले नाही.
- अपिलार्थी यांनी दिनांक १४ फेब्रुवारी २०१४ रोजी शेतीसाठी वीज कनेक्शन गट क्र.३८/३/इ या गटामधील शेतीत जलसिंचन देता यावे करीता वीज जोडणी मिळण्यासाठी अर्ज केला व त्यासाठी दिनांक १४ फेब्रुवारी २०१४ रोजी अनामत रक्कम रू.६६७०/- चा भरणा कला. अपिलार्थीच्या शेतापासून वीज वाहिनीचे अंतर ५ पोलचे असल्यामुळे नियमानूसार सर्व्हिस कनेक्शन घेणे शक्य नसल्यामुळे योग्य बाबींची पूर्तता करून ५ पोलची व्यवस्था करून वीज जोडणी मिळण्याबाबत अर्ज केला.
- वीज कायदयानुसार दोनशे फुटापेक्षा जास्त अंतर असेल तर सर्व्हिस कनेक्शन देता येत नाही. सदर अंतर जास्त असल्यास सर्व रिपोर्ट घेऊन ग्राहकाचा प्रतिक्षा यादीत समावेश

होतो. वीज कायदयानुसार अर्ज दिल्यापासून दहा दिवसामध्ये सर्वे करून रिर्पोट देणे परवानाधारकास बंधनकारक आहे. माननीय विद्युत लोकपाल यांच्या निकालपत्रात प्रतिवादी यांनी कनेक्शनबाबतचा २०१४ कोणताही रिर्पोटची प्रत सुनावणी दरम्यान दाखल केलेली नाही. तसेच घटनास्थळाचे अवलोकन न करता वीज चालू करणे ही प्रतिवादी यांची चूक आहे.

- माननीय विद्युत लोकपाल यांनी त्यांच्या आदेशात हे निरिक्षण नोंदविले नाही की, कृषीपंपाची वीज जोडणी दिल्यानंतर वीजकायदयानुसार प्रत्येक तीन महिन्यास परवानाधारक यांनी वीज मीटरचे अवलोकन करणे गरजेचे आहे. परंतू या तक्रारीच्या अनुषंगाने प्रतिवादी यांनी वीजमीटरचा कोणताही अहवाल सादर केला नाही. त्याचप्रमाणे कनिष्ठ अभियंता, बेगमपूर यांनी वीज वापर नसल्याचे अहवालात नमुद केले आहे. सदर बाब पूर्णतः नियमबाह्य आहे. तसेच वीज कनेक्शन चालू केल्यानंतरही त्यांनी अपिलार्थीना कधीही वीज देयकाची प्रत दिलेली नाही. तसेच सदर अनुषंगाने अपिलार्थी यांनी कधीही वीज देयके भरलेली नाही. सदर बाब परवानाधारक यांनी त्यांच्या स्थळतपासणी अहवालात मान्य केलेलो आहे.
- प्रतिवादी यांनी, अपिलार्थी हे वीज वापर करीत होते याचा कोणताही पुरावा सादर केलेला नाही. प्रतिवादी यांनी त्यांच्या लेखी युक्तिवादाच्या शाबितीसाठी पुरावा कायदयानुसार योग्य ती कागदपत्रे सादर करणे आवश्यक होते. त्यांनी सादर केलेल्या स्थळतपासणी अहवाल व रिर्पोटनुसार वीज वापर करीत नसल्याचे सिध्द होत, सदर रिपोर्ट हा कनिष्ठ अभियंता, बेगमपूर, मोहोळ यांनी अपिलार्थीनी कक्ष व मंचाकडे अपिलार्थीने सादर केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेला आहे. माननीय विद्युत लोकपाल यांनी त्यांच्यासमक्ष सादर असलेल्या स्थळ तपासणी अहवाल व इतर कागदपत्राच गांर्भियाने निरिक्षण केल्याचे दिसून येत नाही. तसेच सुनावणी दरम्यान माननीय विद्युत लोकपाल यांनी २०१४ पासून ते कनेक्शन कायमस्वरूपी बंद करण्यात येईपर्यंत कार्यरत असणाऱ्या सर्व कनिष्ठ अभियंता व लाईनमन यांचे लेखी जबाब घेणेबाबत प्रतिवादी यांना आदेशीत केले होते. परंतू प्रतिवादी यांनी सदर अवहेलना करून कोणतीही कागदपत्रे व जवाब दाखल सुनावणी केले नाही, याचेही निरिक्षण निकालपत्रामध्ये केलेले दिसून येत नाही. तसेच माननीय विद्युत लोकपाल यांनी नोटीसीमध्ये त्यांना टेस्ट रिर्पोट दाखल करण्याबाबत आदेशीत केले होते. परंतू त्यांनी ते दाखल केले नाहीत. या अनुषंगाने कोणतेही निरिक्षण केलेले नाही.

- अपिलार्थींनी दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी वीजदेयक चालू केल्याचे समजल्यानंतर उपकार्यकारी अभियंता, मोहोळ यांना तात्काळ अर्ज देऊन वीज देयक कमी करण्याबाबत विनंती केली होती व सदर विनंती अर्जावरून कार्यालयाकडुन कोणतीही कार्यवाही करण्यात आली नव्हती. हि बाब निरिक्षणात माननीय विद्युत लोकपाल यांनी नोंदविली नाही. वीज कायदयानूसार तक्रार अर्ज प्राप्त झाल्यानंतर तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक आहे. अर्ज दिल्यानंतरही अपिलार्थी यांचे वीज देयके चालू राहीले होते. सदर अर्ज व त्याचावरील कार्यवाही ची मागणी सुनावणी दरम्यान अपिलार्थीने केली, हि बाब आपण आपल्या निरिक्षणामध्ये घेतल्याचे दिसून येत नाही.
- अपिलार्थीने झालेल्या अन्यायाबाबत दिनांक २७ डिसेंबर २०१७ रोजी अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता, महावितरण सोलापूर याना प्रत्यक्ष भेटून तक्रार केली होती, तरीही अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी अपिलार्थीची चालू नसलेल्या वीज जोडणी चे वीज देयक कमी केले नाही. तसेच अर्जावर कोणतीही कार्यवाही केली नाही. कनिष्ठ अभियंता यांचा चौकशी अहवाल, अर्जावरील कार्यवाही अहवाल मागविण्याबाबत माननीय विद्युत लोकपाल यांच्याकडे मुळ तक्रारीमध्ये विनंती केली होती, त्याच्यावरही कोणतीही कार्यवाही झाली नाहो.
- सन २०१७ रोजी वीज देयक कमी करून वीज कनेक्शन चालू करण्याबाबतचा अर्ज दिलेला असताना प्रतिवादी यांनी ४ एप्रिल २०१९ रोजी विनाअर्ज अपिलार्थी याचे, वीज वापर नसलेले व कोणताही वीजपुरवठा नसताना, वीज देयक दिलेल वीज कनेक्शन प्रतिवादीने खंडीत करण्यात आले. त्यामुळे अपिलार्थी यांनी २९ ऑगष्ट २०१९ रोजी बारामती मंचाकडे तक्रार दाखल केली. मात्र मंचाने अपिलार्थीस कक्षाकडे तक्रार दाखल करण्याबाबत दिनांक ७ सप्टेंबर २०२० रोजी आदेशीत केले. त्यानुसार अपिलार्थीने दिनांक १ जुलै २०२० रोजी सोलापूर कक्षाकडे तक्रार अर्ज दिला होता. याबाबींकडे माननीय विद्युत लोकपाल यांचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे.
- अधिक्षक अभियंता यांच्याकडे जो तक्रार अर्ज दिला होता, त्यातोल सर्व तक्रारीचे निराकरण कक्षाकडे विहित मुदतीत झाले नाही, म्हणून अपिलार्थी यांनी बारामती मंचाकडे तक्रार दाखल केली व त्यानंतर अपिलार्थी यांना एक वर्षानी मंचाने कक्षाकडे तक्रार दाखल करण्याचे आदेश दिले. त्यानूसार कक्षाकडे तक्रार दाखल केली, त्यावेळी मुदतीबाबत कोणतीही हरकत घेण्यात आली नव्हती, याकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे.

- तक्रारी संबधीत सर्व कागदपत्रे मागवून नियमानूसार चौकशी करणे आवश्यक असते, त्याबाबत तोंडी व लेखी निवेदन देऊनही अपिलार्थी यांनी दिलेले तक्रार अर्ज व त्यावरील चौकशी रिपोर्ट मागवून घेतले नाही. त्यामुळे न्यायतथ्य माननीय विद्युत लोकपालांपुढे आले नाही. या पुर्नचौकशीच्या वेळेस अपिलार्थी यांनी दिलेले सर्व अर्ज व त्यावरील कारवाई रिपोर्ट सादर करण्याबाबत आदेशीत व्हावेत. माननीय विद्युत लोकपाल यांनी प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या म्हणण्याचा व स्थळतपासणी अहवालाचे योग्य ते निरिक्षण निकालपत्रात दिसून येत नाही. अपिलार्थी यांच्या शेतात कोणताही वीज पुरवठा नव्हता हे कनिष्ठ अभियंता यांच्या स्थळ तपासणी अहवालावरून स्पष्ट झाले, तरीही, त्याचा उल्लेख निकालपत्रात नाही. अपिलार्थी यांच्या शेतात कोणताही वीज पुरवठा नव्हता तसेच, आजूबाजूच्या शेतकऱ्यांशी संपर्क केला असता वीज वापर नसल्याचे समजत, याचाही उल्लेख निकालपत्रात नाही. माननीय विद्युत लोकपाल यांनी कक्षाचा व मचांचा निकालाचा उल्लेख केल्याचे दिसून येत नाही. निकालपत्रामध्ये अपिलार्थी यांचे वीज देयक कमी करून देण्याबाबत संमती देण्यात आली होती; पण वीज कनेक्शन बंद होऊन एक वर्ष झाल्यामुळे पुनः चालू करता येणार नाही असे सुनावणी दरम्यान युक्तीवाद केला होता त्याचाही उल्लेख नाही. माननीय विद्युत लोकपाल यांनी तक्रारीमध्ये दिलेल्या सर्व मुद्दाचा आढावा घेऊन त्रयस्तपणे निकाल देणे अधिनियमानूसार आवश्यक आहे.
- अपिलार्थीनी सुनावणी दरम्यान तक्रारीमधील प्रत्येक मुद्याच्या शाबितीसाठी दस्ताऐवजासह योग्य तो पुरावा दिलेला होता. त्याचे विश्लेषण करताना, दोन्ही बाजूंचा पुरावा ध्यानात घेतल्याचे दिसून येत नाही. प्रतिवादी यांनी सादर केलेला पुरावा देखील अपिलार्थी यांनी दिलेल्या तक्रार अर्जाला पोषक असा होता त्याचे त्रयस्तपणे विश्लेषण केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस २०१४ पासून केव्हाही वीज देयके दिल्याचा दावा वा पुरावा दिलेला नसताना माननीय विद्युत लोकपाल यांनी मात्र २०१४ पासून वीज देयके दिल्याचे नमुद केले आहे. सुनावणी दरम्यान माननीय विद्युत लोकपाल यांनी पुराव्याचे अवलोकन व निरिक्षण करून निकाल देणे अपेक्षित आहे. पण माननीय विद्युत लोकपाल यांनी अपिलार्थीनी ग्राहक या नात्याने योग्य तो पुरावा दिलेला असताना आणि प्रतिवादी यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या पृष्टयर्थ कोणताही पुरावा दिलेला नसताना विनाकारण काल्पनिक अंदाज काढून प्रतिवादींच्या बाजून निकाल दिलेला आहे. सदर बाब ही कायदयानूसार ग्राहय नाही.

- अपिलार्थी यांनी पुनविलोकनामध्ये नमुद केले की, प्रतिवादींनी अपिलार्थीच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीचे रिर्पोट प्रतिवादीकडून सुनावणी घेण्यापुर्वी मागविण्यात यावत. त्यानंतर सर्व कागदपत्रांची छाननी करून वीज देयके नियमानूसार कमी करून वीज जोडणी तात्काळ देणेबाबत प्रतिवादी यांना आदेशीत करावे व योग्य ती नुकसान भरपाई देण्यात यावी.

४. प्रतिवादीचे दिनांक १७ मे २०२१ च्या पत्रान्वये त्यांचे लेखी म्हणणे संक्षिप्तपणे खालील प्रमाणे आहे.

- अपिलार्थी यांचा पुनर्विलोकन अर्ज चुकीचा व कायदेशीर नाही त्यामुळे सदर अर्जातील संपूर्ण मजकुर नाकारण्यात येतो.
- माननीय विद्युत लोकपाल यांनी अभिवेदन क्र.६/२०२१ मध्ये दिनांक ३१ मार्च २०२१ रोजी दिलेला निकाल, दोन्ही बाजूचे म्हणणे व सादर केलेल्या संपर्ण कागदपत्रांच योग्य निरीक्षण करून निष्कर्ष काढून निकाल दिलेला आहे. सदर निकालाचे पुनर्विलोकन करण्याचे कोणतेही सबळ कारण नाही. त्यामुळे सदर अर्ज स्वीकारता येणार नाही.
- ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२० मधील नियम क्र.२२ अन्वये पुनर्विलोकनाची तरतूद करण्यात आली आहे. त्या प्रमाणे केवळ खालील परिस्थितीतच पुनर्विलोकन अर्ज करता येतो.
  (अ) अभिलेखावरून चुक किंवा दोष असल्याचे सकृत दर्शनी दिसून आल्यास.
  (ब) एखादी नवीन आणि महत्वाची बाब किंवा पुरावा मिळाला, जो योग्य काळजी घेवुनही ज्ञात नव्हता किंवा जो आदेश पारित करण्यात आला, त्यावेळेस सादर करू शकला नाही. तसेच, अशा पुनर्विलोकनासाठीच्या अर्जात ती बाब किंवा पुरावा जो योग्य काळजी घेवुनही अर्जदाराला ज्ञात नव्हता किंवा जो आदेश देण्याच्या वेळेस सादर करू शकला नाही, किंवा अभिलेखा वरुन चुक किंवा दोष असल्याचे सकृत दर्शनी दिसते, त्याबाबत स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक आहे.

  माननीय विद्युत लोकपालांच्या सविनय निदर्शनास आणून दऊ इच्छितो की, पुनर्विलोकन अर्जदार यांनी त्यांचे अर्जात कोणताही नवीन आणि महत्वाचा पुरावा सादर केलेला नाही किंवा अभिलेखा वरून चुक किंवा दोष असल्याचे सकृत दर्शनी दिसून आलेबाबत स्पष्टपणे नमुद केलेले नाही. केवळ याच कारणावरून सदर पुनर्विलोकन अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

- सदर अर्जात अपिलार्थीने अर्जावरील कार्यवाहीचे रिपोर्ट प्रतिवादीकडून सुनावणी घेण्यापर्वी मागविण्यात यावे व त्यानंतर सर्व कागदपत्रांची छाननी करून नियमानुसार वीज देयक कमी करून तात्काळ वीज जोडणी देणेबाबत प्रतिवादी यांना आदेश देण्यात यावेत असे नमुद केले आहे त्याप्रमाणे अर्जदाराने त्यांच्या अर्जात पुनर्विलोकन करण्याची मागणीच केलेली नाही व मुळ अजातोलच मागणी पुनश्चः केलेली आहे. याशिवाय नवीन किंवा महत्वाचा पुरावा सादर केलेला नाही किंवा अभिलेखातील चुक किंवा दोष असल्याचे सकृत दर्शनी दाखविले नाही. याउलट, कार्यवाहीचे रिपोर्ट प्रतिवादीकडून मागविण्यात यावे अशी मागणी करत आहेत, जे की पुनर्विलोकन अर्जात करता येणार नाही.
- पुनर्विलोकन अर्जाच्या नावाखाली तक्रारीची संपर्ण सुनावणी पुन्हा घेता येणार नाही. तसेच अपिलाप्रमाणे पुन्हा संपर्ण पुराव्याची छाननी करता येणार नाही. तसेच एखादया बाबी बाबतीत दोन मते असू शकतात, या मुद्दयावर पुनर्विलोकनासाठी सकृत दर्शनी दिसणारी चुक किंवा दोष दाखविणे आवश्यक आहे. न्यायिक युक्तिद्वारे सिध्द करण्याजोगी चुक / दोष पुनर्विलोकन अर्जात येत नाही. माननीय विद्युत लोकपाल यांनी अर्जदाराच्या कागदपत्रांचे अवलोकन करून निष्कर्ष काढले नाहीत / गार्भियाचे निरिक्षण केल्याचे दिसून येत नाही / निरिक्षणच नोंदविले नाही / निरिक्षणात सदरची बाब विचारात घेतली नाही / योग्य ते निरीक्षण नोंदवले नाही / काल्पनिक अंदाज काढून निकाल दिला असे आरोप करून माननीय विद्युत लोकपाल यांचे त्रयस्तपणाबाबत संशय व्यक्त करून पुनर्विलोकन करता येणार नाही. या सर्व बाबींमुळे सदरचा अर्ज कायद्याचा दृष्टीकोनातून टिकणारा नाही.
- विद्युत लोकपाल यांनी सदर निकालामध्ये अपिलार्थी यांचा अर्ज हा हेतू परस्पररित्या वीज देयके न भरण्यासाठीच्या अर्विभावात केलेले अभिवेदन वाटते असा निष्कर्ष काढलेला असून त्यास समर्पक कारणमिमांसा दिलेली आहे.
- विद्युत लोकपाल यांनी सदर निकालामध्ये अपिलार्थी यांना 'महावितरण आपल्या दारी' या योजनेद्वारे वीज पुरवठा करण्यात आला व त्या अनुषंगाने अपिलार्थीस त्याचा लाभ देण्याच्या दृष्टीने पावती क्र.१२६८७०२ नुसार रु.६६०७/- इतका भरणा दिनांक १४ फेब्रुवारी २०१४ रोजी करून घेतला व अपिलार्थीस लाभार्थी करून घेण्यात आले. विशेष म्हणजे त्या पावतीवर संक्षीप्त रूपात MAD असे लिहिलेले होते. सर्व साधारण वीज जोडणीसाठी MAD ही योजना उपलब्ध नव्हती. यावरून हे स्पष्ट होते की, कोटेशन रक्कम भरली त्यावेळी अर्जदार वीज वापरत होते. तसेच अर्जदार यांनी त्यांच्या अभिवेदनात नमुद केले आहे की, कनेक्शन बंद

करण्याबाबत कोणतीही विनंती नसताना वीज जोडणी बंद करण्यात आली. यावरून माननीय विद्युत लोकपाल यांनी निष्कर्ष काढला की, अर्जदाराकडे वीज जोडणी चालू स्थितीत होती अन्यथा अपिलार्थीने तसे नमुद करण्याचे काहीही कारण नाही. सबब माननीय विद्युत लोकपाल यांचा सदरचा निष्कर्ष योग्यच आहे.

- माननीय विद्युत लोकपाल यांच्या सुनावणी दरम्यान दिलेल्या तोंडी आदेशाप्रमाणे उपलब्ध कागदपत्र जसे ग्राहकाचे गट क्र. ३८/३/ई मधील चालू वीज देयक, वीज जोडणीचे सीपीएल, गट क्र.१७/१/सी मधील वीज देयक शाखा अभियंता बेगमपूर यांचा जबाब, माननीय विद्युत लोकपाल यांना सादर केलेली आहेत. त्यामुळे ही कागदपत्रे सादर केली नाही हे म्हणण चुकीचे आहे. अपिलार्थी यांना त्याची केस सिध्द करता आली नाही, सहाय्यक अभियंता बेगमपूर यांचा २०१७ मधील कोणताही अहवाल उपलब्ध नाही त्यामुळे त्याबाबत निरिक्षण नोंदविण्याचा प्रश्नच उदभवत नाही.
- अपिलार्थीच्या सीपीएल मध्ये दर तीन महिन्याला वीज देयके जारी केल्याची नोंद आहे, तसेच दिनांक ६ एप्रिल २०१७ रोजी वीज देयके चालू केल्याचे समजते, म्हणजे अपिलार्थीस वीज देयके मिळत होती. यावरून माननीय विद्युत लोकपाल यांनी जुलै २०१४ पासून अपिलार्थीस वीज देयके मिळत होती असा निष्कर्ष कागदपत्रावरून काढला.
- शाखा अभियंता बेगमपूर यांनी दिनांक ४ ऑगष्ट २०२० चा दिलेला अहवाल हा त्यांचे वीज पुरवठा बंद केला त्या दिनांक ४ एप्रिल २०१९ रोजी नंतरचा आहे. त्यामुळे स्थळ तपासणीत वीज वापर होत नसल्याचे नमूद आहे. त्या अनुषंगाने माननीय विद्युत लोकपाल यांनी २०२० च्या अहवालावरून २०१४ च्या परिस्थितीचे अवलोकन वा सत्य परिस्थितीची खातरजमा होत नाही, त्यामुळे सदर अहवालाचा गार्भीयाने निरीक्षण केले नाही हे म्हणण चुकीचे आहे.
- अपिलार्थीच्या अर्जातील विसंगती माननीय विद्युत लोकपाल यांनी नोंदवून निष्कर्ष काढलेले आहेत, उदाहरणार्थ अर्जदार यांनी 'महावितरण आपल्या दारी' योजने अंर्तगत दिनांक १४ फेब्रुवारी २०१४ रोजी रक्कम भरली व त्याच दिवशी एका विशिष्ठ पध्दतीने वीज पुरवठा करावा असे पत्र लिहिल, अपिलार्थी यांची विहीर बुजलेली असताना, वीज जोडणीची मागणी करणे याचे आकलन होत नाही. यावरून माननीय विद्युत लोकपाल यांनी अपिलार्थीच्या अभिवेदनाचा सखोल अभ्यास केलेला हे दिसते त्यामुळे अपिलार्थीनी याबाबत केलेले आरोप निराधार व चुकीचे आहत.

- तत्कालीन कनिष्ठ अभियंता, बेगमपूर यांनी त्यांच्या जबाबामध्ये नमुद केले आहे की, ग्राहकाने 'महावितरण आपल्या दारी' योजने अंर्तगत कोटेशन भरले आहे, सदर योजनेनुसार ज्या अर्जदाराच वीज कनेक्शन चालू आहे व पाच पोल पर्यतंचे अंतर आहे अशा ग्राहकांनी कोटेशन भरावयाचे आहे. ज्या ग्राहकानी 'महावितरण आपल्या दारी' योजने अंर्तगत कोटेशन भरले आहे; त्या ग्राहकांना (NSC) न्यु सर्व्हिस कनेक्शन प्रणालीमध्ये बल्क अपलोडद्वारे चालू झाले असण्याची शक्यता आहे असे नमुद केले आहे.
- अपिलार्थीने २०१४ मध्ये दिलेल्या वीज देयकाबाबत 2020 मध्ये मंचाकडे तक्रार नोंदविली आहे. त्यावर माननीय विद्युत लोकपाल यांनी, अर्जदाराने दोन वर्षाच्या आत तक्रार दाखल न केल्यामुळ ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६ मधील विनियम ६.६ या निकषावर पात्र ठरत नाही.
- पुनविलोकन अर्जात अपिलार्थीने नमुद केले आहे की, दिनांक २९ ऑगष्ट २०१९ रोजी मंचाकडे अर्ज दिला आहे, त्यांनी अपिलार्थीस सोलापूर कक्षाकडे तक्रार अर्ज देण्याबाबतचा आदेश दिनांक ७ सप्टेंबर २०२० रोजी अर्ज दिला, त्याप्रमाणे अपिलार्थी यांनी दिनांक १ जुलै २०२० रोजी कक्षाकडे तक्रार अर्ज दिला. वरील सर्व तारखांबाबत विसंगती दिसून येते.
- अपिलार्थीने सर्वप्रथम 'क्ष' फॉर्म मध्ये कक्षाकडे तक्रार दाखल केलेली नाही, त्यामुळे अर्ज ग्राह्य धरता येत नाही. तरी प्रथमतः सोलापूर कक्षाकडे अर्ज करावा असे कळविले होते. सदर बाब मंचाने एक वर्षानी कळविलो हा अपिलार्थीचा आरोप चुकीचा आहे. मुदतीची तरतूद हि मंचामध्ये दाखल केलेल्या तक्रारीबाबत असून कक्षाबाबत नाही असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे, कक्षाकडील सुनावणीत मुदतीचा मुद्दा उपस्थित केला नाही हे म्हणण चुकीचे आहे.
- अपिलार्थी यांची रू.१,०५,८००/- ची थकबाकी आहे, तसेच अपिलार्थी यांची गट क्र.१७/१/सी मधील ग्राहक क्र.३४५४९००३०१२८ वर डिसेंबर २०२० अखेर रक्कम रू.६०,२२०/- थकबाकी आहे. अशा प्रकारे वीज देयक न भरता मंच किवा विद्युत लोकपाल याचेकडे दाद मागता येणार नाही. त्यामुळे अपिलार्थीस थकबाकी रक्कम भरण्याचे आदेश देण्यात यावे.
- माननीय विद्युत लोकपाल यांनी मळ अभिवेदनावर दिलेला निकाल सपूर्ण बाबींचा सखोल अवलोकन करून दिलेला असल्याने वरील सर्व मुद्दयांचा विचार करून पुनर्विलोकन अर्ज रद्द करण्यात यावा ही विनंती.

५.	कोवीड-१९ मुळे सदर अभिवेदनाची ई-सुनावणी प्रथमतः दिनांक २७ मे २०२१ रोजी घेण्याची नोटीस संबधितांना पाठविली होती, परंतू अपिलार्थी यांनी पुढील तारखेची मागणी केली. त्यानंतर सुनावणी दिनांक १० जून २०२१ रोजी घेण्यात आली.

६.	सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षांनी युक्तिवाद केला. दोन्ही पक्षांनी आपल्या लेखी निवेदनातील मुद्दे पुनश्चः मांडले. सुनावणी दरम्यान माननीय विद्युत लोकपाल यांनी प्रतिवादी यांना त्यावेळीचे तत्कालीन वीज कर्मचारी व इतर यांचे जबाब घेऊन ते सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे प्रतिवादी यांनी दिनांक १८ जून २०२१ रोजीच्या पत्रान्वये सदर जबाब सादर केले. जबाबात विसंगती असल्यामुळे ह्या आदेशासाठी त्यांचा वापर करण योग्य ठरणार नाही.

**विश्लेषण व निर्णय**

७.	दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

पुनर्विलोकन अर्जाबाबत ग्राहक गाऱ्हाणे विनियम, २००६ मधील विनियम १९ मध्ये खालील तरतुद आहे :-.

*"१९ <u>आदेशाचे पुनर्विलोकन</u> :*

*१९.१	विद्युत लोकपालाच्या आदेशाने बाधीत झालेली कोणीही व्यक्ती तिला जर एखादी नवीन आणि महत्वाची बाब किंवा पुरावा मिळाला, जो योग्य काळजी घेऊनही तिला ज्ञात नव्हता किंवा जो आदेश देण्याच्या वेळेस सादर करू शकला गेला नाही, किंवा अभिलेखावरून चुक किंवा दोष असल्याचे सकृत दर्शनी दिसुन आल्यास, अशी व्यक्ती आदेशाच्या दिनांकापासुन तीस (३०) दिवसाच्या आत अशा आदेशाचे पुनर्विलोकन करण्यासाठी विद्युत लोकपालाकडे अर्ज करू शकेल.*

*१९.२	अशा पुनर्विलोकनासाठीच्या अर्जात ती बाब किंवा पुरावा, जो योग्य काळजी घेऊनही व्यक्तीला ज्ञात नव्हता किंवा जो आदेश देण्याच्या वेळेस सादर करू शकला गेला नाही, किंवा अभिलेखावरून चुक किंवा दोष असल्याचे सकृत दर्शनी दिसुन येते, स्पष्टपणे नमुद करण्यात*

*येईल. विद्युत लोकपालाला हवी असलेली कागदपत्रे, सहाय्यकारी आकडेवारी आणि वितरणपत्रे अर्जासोबत जोडण्यात येतील.*

*१९.३ जर पुनर्विलोकनासाठी पुरेसे कारण नसल्याचे विद्युत लोकपालाला आढळुन आले तर विद्युत लोकपाल असा पुनर्विलोकन अर्ज फेटाळेल. परंतू असे की, अर्जदाराला त्याची बाजु मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणताही अर्ज फेटाळण्यात येणार नाही."*

अपिलार्थी ग्राहकाने सदर अर्जात उपस्थित केलेले सर्व मुद्दे यापूर्वी सादर केलेल्या अभिवेदन क्रं. ६ / २०२१ मध्ये नमूद केले होते. अपिलार्थी यांनी सदर पुनर्विलोकन अर्जात या खेरीज इतर कोणतेही नवीन मुद्दे उपस्थित केलेले नाहीत की, ज्यामुळे मूळ आदेशात बदल करणे गरजेचे राहील. पुनर्विलोकन याचिकेची व्याप्ती ही मर्यादित असते; मात्र, अपिलार्थी या ठिकाणी पुनर्विलोकन याचिकेच्या माध्यमातून संपूर्ण प्रकरणाची पुनश्चः सुनावणी घेण्याची विनंती करीत आहेत, असे सकृत दर्शनी दिसते. मळ आदेशाचा आढावा घेण्याचे कोणतेच सबळ कारण नव्याने समोर आलेले नाही. या अनुषंगाने येथे नमुद करणे गरजेचे आहे की,

अपिलार्थी यांनी त्यांची विहीर बुजली असताना तेथे वीज जोडणी घेण्याचे प्रयोजन नव्हते असे मुळ सुनावणीच्या वेळेस सांगितले मात्र, आता त्यांनी तेथे वीज जोडणी देण्यात यावी असे आदेश पारीत करण्यात यावेत अशी विनंती केली हा विरोधाभास आकलनीय नाही. त्याचप्रमाणे त्यांनी 'महावितरण आपल्या दारी' या योजने अंर्तगतच योग्य त्या रक्कमेचा भरणा केला ही बाब दृष्टीआड करता येणे शक्य नाही व हि योजना अश्याच लोकांसाठी होती ज्यांनी अनधिकृतपणे वीज जोडणी स्वतःहून घेतली व अश्या सर्व ग्राहकांना मळ प्रवाहात सामोल करून घेऊन नियमीत करण्या साठीच्या व्यापक हित लक्षात घेता महावितरणने राबविली होती.

सबब, विनियम १९ मधील तरतुदो पाहता, सदर पुनर्विलोकन अर्ज फेटाळण्यात येत आहे.

सही/-
(दिपक लाड)
विद्युत लोकपाल (मुंबई)